International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.2 November – December 2023

# आदिवासी कादंबऱ्यांतील आदिवासींच्या समस्या : एक अभ्यास

**डॉ. ए. एम. वळवी**

*सहायक प्राध्यापक,*

*डॉ. पतंगराव कदम आर्टस् अँण्ड कॉमर्स कॉलेज पेण, जि. रायगड*

***Corresponding Author - डॉ. ए. एम. वळवी***

**DOI - 10.5281/zenodo.17381125**

**प्रस्तावना :**

लेखक हा समाजाचा घटक असतो. अन्य व्यक्तींपेक्षा त्याला सामाजिक समस्याची चाहूल सर्व प्रथम लागते. त्याला भेडसावणारे समाजातील विभिन्न प्रश्न, समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न करतच साहित्याच्या सर्व प्रकारातून तो त्याचे चिंतन मांडत असतो. हे जगातील सर्व भाषांतील साहित्यातून लेखक मोठ्या ताकतीने करत असतात. या त्यांच्या समस्या मांडणीतून एका नवीन विचाराचा जन्म होवून सामाजिक क्रांती तर होताच असते शिवाय त्यातूनच नवीन समाजाचा उदय होत असतो. मराठी भाषेत लिहिले जात असलेले आदिवासी साहित्यदेखील त्याला अपवाद नाही. सामाजिक बदलातून-स्थिरावलेपणातून निर्माण झालेल्या असंख्य सामाजिक प्रश्नांचा वेध या साहित्याने वेळोवेळी घेतलेला आहे. कथा, कविता व काही अंशी नाटकातून या समस्या मांडल्या जात आहे. कादंबरी हा साहित्यप्रकारही त्याला अपवाद नाही. कादंबरी या साहित्य प्रकारातून आदिवासी जीवन हे एकोणीसशे वीसपासून मांडले जात आहे. खऱ्या अर्थाने एकोणीसशे चाळीसनंतरच्या आदिवासी जीवनावर लिहिलेल्या कादंबऱ्यांतून आदिवासी समाजात असलेले विविध प्रश्न अधोरेखित केलेत. या कालखंडात जरी उपकथानकातून आदिवासी जीवन कादंबरीतून मांडले गेले असले तरी आदिवासींच्या शोषण करणाऱ्या व्यवस्थे कशी समाजात कार्यरत आहे. यावर नेमके बोट ठेवत सामाजिक शोषणाचा प्रश्न उभा केला. त्यानंतर लिहिल्या गेलेल्या कादंबऱ्यांनी आदिवासी समाजाच्या समकालीन गरिबीला, त्यांच्यातील अंधश्रधे, त्यांच्यातील निरक्षरतेला, कुपोषणाला जबाबदार कोण असे असंख्य सवाल उपस्थित करून येथल्या व्यवस्थेला विचार करायला भाग पाडले.

या अनुषंगाने आदिवासी जीवनावर लिहिलेल्या नवदोत्तर मराठी आणि हिंदी कादंबरी वाङमयाच्या लेखकांनी आदिवासींच्या उत्थानाच्या संदर्भात कादंबरीतून सवाल उपस्थित केले आहेत आहे? सवाल उपस्थित केले आहेत तर ते कितपत केलेले आहे? याचा शोध घेण्याचा प्रयत्न येथे करणार आहे.

नवदोत्तर आदिवासी मराठी कादंबऱ्यांतील **नजुबाई गावीत** लिखित **'तृष्णा'** या कादंबरीत मावची भिल्ल या आदिवासी जमातीचे ठळक चित्रण त्यानी केलेले आहे. खुद्द लेखिका त्याच जमातीतून पुढे आलेल्या असल्याने त्यांना भेडसावणारे प्रश्न म्हणजे त्यांच्या समाजाचे प्रश्न आहेत हे खचितच योग्य आहे. आपल्या आदिवासी समाजाचे अनेक प्रश्न या कादंबरीतून त्यानी मांडलेले आहे. ब्रिटीश शासनाच्या वननीतीचा किती जबरदस्त फटका आदिवासींना बसला होता त्याची जळजळीत आठवण ही कादंबरी करून देते. आदिवासींना अपेक्षा होती की ठीकच आहे, ब्रिटीश शासन होते म्हणून त्याचा फटका आदिवासींना बसला होता, पण देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरदेखील भारत सरकारने जंगलविषयक कायद्यांमध्ये बदल न केल्यामूळे आदिवासींचे मुलभूत समस्यादेखील स्वातंत्र्योत्तर कालखंडात सुटल्या नाहीत. जाणीवपूर्वक जणू त्यांच्या या मुलभूत समस्येकडे दूर्लक्ष केल्यामुळे जंगलावर जीवन जगणाऱ्या आदिवासींवर उपासमारीची वेळ आली असल्याची समस्या या कादंबरीत मांडल्याचे लक्षात येते. हीच मूळ समस्या या कादंबरीच्या केंद्रस्थानी आहे असेच वाटते. स्वातंत्र्योत्तर कालखंडातही जंगलात वसलेला आदिवासी शिकार, मासेमारी, रानमेव्याच्या आधाराने आपला चरीतार्थ चालवित होता. वनविषयक कायद्याची नीट अमलबजावणी केली गेली नसल्यामुळे आदिवासींवर जंगलात जाण्यावर निर्बंध लादण्यात आले. परीणामी आदिवासींसमोर जगण्याचा मुलभूत प्रश्न निर्माण झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर शासनकर्त्यांनी ती धोरणे तशीच पुढे चालू ठेवल्यामुळे आजही आदिवासींच्या जगण्याचा प्रश्न आहे तसाच आहे. भरीस भर शेती योग्य जमीनीसाठी वृक्षांची बेसुमार कटाई करून व्यापारी वृक्षांची लागवड केली गेली. जंगलतोडीतून निघालेल्या जमीनींची विक्री केली गेली. आर्थिक सुबत्ता असणाऱ्या आदिवासीएतर समाज आदिवासीबहुल प्रदेशात वसवला गेला. यामुळेच आदिवासी कमालीचा दरीद्री झाला. असल्याचा प्रश्न या कादंबरीतून मांडलेला आहे. या समस्येव्यतिरिक्त आदिवासी वाडी वस्तीवरील मुलांना शिक्षण देण्यासाठी शिक्षणव्यवस्था उदासिन आहे. वाडीवस्तीवर शाळेसाठी शिक्षक, इमारती नाही. काही शिक्षकांकडून शाळेतील आदिवासी मुलींवर लैंगिक अत्याचार केले जात आहे. आदिवासी स्त्रियांना उपासमारीतून वाचण्यासाठी देहव्यापार करावा लागत आहे याला जबाबदार कोण? ही वेळ त्यांच्यावर कोणी आणली? आदिवासींमध्ये व्यसन, अंधश्रध्दांचे प्रमाण आजही लक्षणिय आहे. पोटासाठी आदिवासींवर चोरी करण्याची वेळ का यावी? त्यांच्यात निरक्षरतेचे प्रमाण लक्षणीय असल्यानेच त्यांचे धनिक व्यापारी, सावकार लुट करत असल्याच्या समस्या या कादंबरीतून मांडलेल्या आहेत. या आणि यासारखे असे असंख्य प्रश्न या कादंबरीने विचारलेले आहेत.

**माधव सरकुंडे** लिखित **'वाडा'** या कादंबरीतून आंध आदिवासी जमातीत निर्माण झालेले काही प्रश्न या कादंबरीने उपस्थित केलेले आहे. आंध जमातीत

शिक्षणाचे म्हणावे तसे प्रमाण नाही. निरक्षरतेमुळे शिक्षित उच्चवर्णिय गावपाटीलाकडून फसवणुक, आर्थिक, सामाजिक, शोषण केले जात आहे. स्त्रियांवर पोलीस कर्मचाऱ्यांच्या संगनमताने सर्रासपणे लैंगिक अत्याचार केले जात आहे. आजही आंधांना सावकाराकडून शेतीसाठी कर्जाची उचल करावी लागते. शासकिय योजना त्यांच्यापर्यंत पोहोचू दिल्या जात नाही. स्थानिक पातळीवर कामाची उपलब्धता नसल्याने चरीतार्थ चालविण्यासाठी स्थलांतर करावे लागते. आरोग्याच्या सुविधा त्यांच्यापर्यंत पोहोचल्या नसल्याकारणाने गरोदर महिलांना उघडयावरच प्रसुती व्हावे लागते. जाच करणाऱ्या गावपाटलाकडून अनेक आदिवासींची हत्या केली जात आहे. तरीही शासनकडून त्याला अभय दिले जात आहे. याशिवाय आंध आदिवासीमध्ये अंधश्रध्दांचे, व्यसनाचे प्रमाण लक्षणिय आहे? असे असंख्य सवाल या कादंबरीने विचारलेले आहे. **बाबाराव मडावी** यांच्या **'टाहो'** या कादंबरीतून अनेक प्रश्न उपस्थित केले गेलेले आहे. परीणामी निरक्षरतेमुळे आदिवासींचा विकास झाला नाही आणि शासनाच्या विविध धोरणांची माहिती झालीच नाही. आणि ते त्यांना मिळवता आले नाही. प्रशासानिक विभागातील अधिकारी वर्गाकडून आर्थिक शोषण होत आहे. स्थलांतरणाचा सामना करावा लागत आहे. नक्षलवादी चळवळीमध्ये आदिवासी तरुण नाहक गोवला गेलेला आहे. कुपोषण लक्षणिय वाढलेले आहे. अंधश्रध्दांचे, व्यसनाचे प्रमाणही निरक्षरतेमुळे या जमातीत लक्षणिय वाढलेले आहे. आदिवासी भागातील प्रशासकिय अधिकारी, जमीनदार उच्च प्रतिच्या फर्निचरसाठी तस्करी करत आहेत. शिवाय जंगलविषयक कायद्याचा फटका आदिवासींना बसला आहे. तसेच याच वर्गाकडून आदिवासी स्त्रियांवर लैंगिक अत्याचार केले जात आहे. काही स्त्रियांना सामाजिक नितीनियमांचा जाच सहन करावा लागत आहे. त्यांच्या वाटयाला बहिष्कृततेचे जीणे आलेले आहे. असे असंख्य सवाल ही कादंबरी निर्माण करते.

**नजुबाई गावीत** लिखित **'भिवा फरारी'** या कादंबरीतून भिल्ल आदिवासींचे काही प्रश्न उपस्थित केलेले आहे. ब्रिटीशांनी वनविषयक कायदा केल्यावर भिल्ल आदिवासींसमोर जगण्याचा बिकट प्रश्न निर्माण झाला. परिणामी चरितार्थासाठी चोरी करावी लागली. शिवाय आदिवासीमध्ये व्यसनाचे आणि अंधश्रध्दांचे प्राबल्य होते. स्त्रियांना 'डाकीण' म्हणून सामाजिक अवहेलनेला सामोरे जावे लागत असे. या सर्वांना जबाबदार कोण असा सवाल ही कादंबरी विचारते. **देवदत्त चौधरी** यांच्या **'पळसचोंड'** या कादंबरीने अनेक सवाल निर्माण केलेले आहे. कोकणा आदिवासी जमातीत शिक्षणाचा अभाव आहे. पावसाच्या पाण्यावर शेती पिकते. परीणामी पाऊस वेळेवर आला नाही तर दुष्काळाचा सामना करावा लागतो. शासनाच्या शेतीपुरक कोणत्याच सोयी सुविधा यांच्या वाडी वस्तीपर्यंत अद्याप पोहोचलेल्या नाहीत. यामुळे या जमातीला वानाधारित आपला चरीतार्थ चालवावा लागतो. आश्रमशाळेतील, रेशनिंग दुकानातील

आहार चोरीला जात आहे. निरक्षरतेमुळे मद्याचे, अंधश्रध्दांचे प्रमाण लक्षणिय आहे. तर दारीद्रयामुळे धर्मांतराचे प्रमाणही वाढत आहे. असे काही सवाल ही कादंबरी निर्माण करते.

नवदोत्तर आदिवासी हिंदी कादंबऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांसंदर्भात **डॉ. दशरथ सगरे** म्हणतात, ''आजादी के साथ नई राजनीति, नया संविधान, समाजवाद, औद्योगीकरण, बॉंध, खान खदान का निर्माण, जंगल कटाई, नागरीकरण, सरकार की विकास नीति आदि के कारण ऑंचलिक जनजीवन प्रभावित हुआ।''[१] या अनुषंगाने **संजीव** लिखित **'धार'** कादंबरीने अनेक प्रश्न उस्थित केलेले आहेत. पिढयानं पिढया ज्या आदिवासी जमाती डोंगरकपारीत राहिल्या त्या डोंगरात खनीज संपत्तीचा शोध लागल्यावर भांडवलदार वर्गाकडून शासन, प्रशासनाला हाताशी धरून आदिवासींना तुम्ही या भुमीचे मालक नाहीत. असा फतवा काढून त्यांना त्यांच्या भूमीपासून फसवणुकीने, दडपशाहीने कधी अत्यल्प पैशांचा मोबदल्यात बेदखल केले जात आहे. प्रदूषणाचा सर्वाधिक फटका संथाळी आदिवासींना बसत आहे. या प्रदूषणामुळे हवा, जमीन, आणि जलस्त्रोतही विषारी बनलेले आहे. शासन प्रशासनही याकडे लक्ष देत नाही. आदिवासी महिलांवर भांडवलदार वर्गातील व्यक्तिंकडून, प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून लैंगिक अत्याचार केले जात आहे. या कादंबरीतील प्रश्नांसंदर्भात **डॉ. रेखा गाजरे** लिहितात, " 'धार' में उपन्यासकार ने आदिवासी स्त्री मैना को केन्द्रीय पात्र के रूप में चित्रित करते हुए उसके माध्यम से आदिवासी स्त्रियों का शोषण, आदिवासी समाज प्र हो रहे अत्याचार एवं आदिवासी जन-जीवन को प्रस्तुत किया है |"[२] तर आदिवासी स्त्रियांना देहव्यापार करावा लागत आहे. अजूनही आदिवासी वाडी वस्तीची शासनाच्या दप्तरात नोंद नाही. यामुळे आदिवासी ख्रिश्चन धर्माचा अधीन होऊ लागलेला आहे. परिणामी हजारो वर्षाची आदिवासींची निसर्गमूलक संस्कृती नष्टप्राय होण्याच्या मार्गावर आहे. निरक्षरतेमुळे आदिवासीमध्ये अंधश्रध्दा, कुधारणा, व्यसनाचे प्रमाण लक्षणिय आहे. याला जबाबदार कोण? असा सावल ही कादंबरी उपस्थित करते. **तेजींदर** यांच्या **'काला पादरी'** या कादंबरीने ख्रिश्चन धर्मियही आपल्या सत्ताबल वृद्धीकरिता आदिवासींचे धर्मांतर करत असून धर्मांतरित आदिवासी व्यतिरिक्त अन्य आदिवासींच्या समस्यांबाबतीत ते उदासीन आहेत. तर आदिवासींनी हिंदू धर्माऐवजी ख्रिश्चन धर्मांचा स्वीकार केला म्हणूनच हिंदू धर्मियांचे सत्ताबल घटलेले आहे. हा राग हिंदूधर्मिय सत्ताधाऱ्यांना असल्याने ते आदिवासींचा विकास करण्याऐवजी त्यांच्या विकासयोजना पळवत आहे. शासन, प्रशासन, प्रसारमाध्यमेदेखील आदिवासींची दखल घेत नाही. परिणामी आदिवासींचा चरितार्थाचा सवाल निर्माण झालेला आहे. याला जबाबदार कोण? असा सवाल ही साहित्यकृती निर्माण करते. यासंदर्भात **डॉ. एकनाथ साळवे** लिहितात, " परंतु एक संस्कृती भाषा आणि साहित्य असणारा समाज म्हणून त्याची दखल स्वराज्य संग्रामात आणि आता लोकशाहीत देखील घेण्यात येत नाही.....आणि

तथाकथित सभ्य संस्कृती धर्म आदिवासींवर लादण्याचा त्यामागे कट आहे हे आता उघड होऊ लागले आहे.”[३] ही कादंबरी हाच सवाल घेऊन उभी राहते. **श्रीप्रकाश मिश्र** लिखित **‘जहाँ बॉस फुलते है’** या कादंबरीतून काही महत्त्वपूर्ण सवाल निर्माण केलेले आहेत. दुष्काळावर योग्य उपाययोजना न केल्याने माओवादी विद्रोही संघटनांनी केलेल्या भारत सरकारच्या विरोधातील हिंसक कारवायांना भारत सरकारने दिलेल्या हिंसक उत्तरामुळे मिजो आदिवासी नाहक भरडला गेलेला आहे. स्वार्थी माओवादी विद्रोही संघटना आदिवासींच्या उत्थानाचे कार्य करत असल्याचा देखावा निर्माण केला गेलला आहे. यामुळे आदिवासींच्या चरितार्थाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. याशिवाय मिजो स्त्रियांवरील लैंगिक अत्याचार, जमीनदार, प्रशासनिक अधिकाऱ्यांच्या शोषणाला बळी पडावे लागत आहे. आदिवासी विकास योजनातील भ्रष्टाचारामुळे आदिवासी दरिद्री जीवन जगत आहे. याला जबाबदार कोण? असे असंख्य सवाल ही कादंबरी निर्माण करते.

**मैत्रेयी पुष्पा** यांच्या **‘अल्मा कबुतरी’** या कादंबरीने आदिवासींच्या संदर्भात अनेक प्रश्न उपस्थित केलेले आहेत. शाळेत जाणाऱ्या आदिवासी मुलांना, तरुणांना जातीपातीचे दाहक चटके सहन करावे लागत आहे. त्यांचा शिक्षक, उच्चवर्णिय उच्चाधिकारी, पोलीस प्रशासनिक व्यवस्थेकडूनही अपमान केला जात आहे. त्यांचे आर्थिक शोषण केले जात आहे. याला विरोध करणाऱ्यावर पशुवत शारीरक, मानसिक अत्याचार केले जात आहे. तर आपल्याच मुलांच्या शिक्षणासाठी धडपडणाऱ्या कबूतरा आदिवासी महिलांना आपल्याच जमातीतील जमातपंचायतीच्या जाचक अटींचा सामना करावा लागत आहे. शिवाय उच्चवर्णिय पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या त्या लैंगिक शोषणाच्या बळी आहेत. चोरी करणारी जमात म्हणून धाडीच्या निमित्तानेही आदिवासी महिलांवर निरंतर लैंगिक अत्याचार होत असतात. अनेक आदिवासी महिला लोकप्रतिनिधी, प्रशासकिय अधिकारी यांच्या लैंगिक भूक भागविण्यासाठी उच्चपदस्थ उच्चवर्णियांकडून जबरजस्तीने या स्त्रियांची तस्करी केली जात आहे. कबूतरा आदिवासीमध्ये निरक्षरतेमुळे अंधश्रध्दांचे, व्यसनाचे प्रमाण लक्षणिय आहे. कायद्याने चोरीचा शिक्का पुसलेला असला तरीही उच्चवर्णिय समाज त्याला मान्यता देत नाही. यामुळे कबूतरांसमोर चरीतार्थाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. उपासमार टाळण्यासाठी ही जमात मद्यविक्रीसह धाड टाकणे, चोरी, हत्यासारखे अवैध धंदे करत असते. या सर्वांना जबाबदार कोण? यासारखे असंख्य प्रश्न घेऊन ही कादंबरी उभी राहाते. **रणेंद्र** लिखित **‘ग्लोबल गॉव के देवता’** या कादंबरीने अनेक सवाल उपस्थिता केलेले आहे. खनीज संपत्तीच्या हव्यासापोटी अनेक कंपन्या आदिवासी इलाख्यातील जमीनी शासन, प्रशासनाच्या संगनमताने लुटत आहेत. शिवाय आदिवासी प्रदेशातील कारखानदारीमुळे आदिवासींच्या आरोग्याच्या बिकट प्रश्न निर्माण झालेला आहे. या समस्यांच्या निराकरणासाठी

अहिंसक मार्गाने अनेक विनंती अर्ज आणि मार्चेही काढले गेले पण विरोध करणाऱ्यांनाच नक्षलवादी घोषित करून त्याच्यावर अमानविय अत्याचार केले जात आहे. यामुळे आदिवासींना स्थलांतर व्हावे लागत आहे. ही प्रक्रिया स्वातंत्र्यानंतरही अविरतपणे चालूच आहे. आदिवासींना दिले जाणारे शिक्षण ही आदिवासींची फसवणुक आहे. आदिवासी शाळांमध्ये अपूर्ण कमचारी वर्ग, इमारतीची दूर्दशा आहे. मुलांच्या आहारात भ्रष्टाचार केला जातो. त्यांच्या जागांवर उच्च जातीतील मुलांना प्रवेश दिले जात आहे. अनेक आदिवासी सुशिक्षित तरूण नोकरीविना भटकंती करत आहेत. आदिवासी स्त्रियांची फसवणुक करून लैंगिक अत्याचार केला जात आहे. महानगरात काम मिळवून देण्याच्या बहाण्याने असंख्य स्त्रियांची विक्री केली जात आहे. या संदर्भात **डॉ. माधुरी साकुळकर** म्हणतात, ''आदिवासी मुलींना कपडे, सौंदर्यप्रसाधने आणि मनोरंजनाच्या साधनांची स्वप्ने दाखवून शहरात नेणाऱ्या दलालांच्या धंदा खूपच तेजीत आहे. जॉब प्लेसमेंट या गोंडस नावाखाली जवळजवळ पाचशे एजन्सीज दिल्लीला आहेत.''[४] तर जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आदिवासींमधील लोकसंस्कृती नष्ट होत आहेत? आदिवासीमध्ये अंधश्रध्दा, व्यसनाचे प्रमाण लक्षणिय आहे? असे असंख्य सवाल या कादंबरीतून उपस्थित केले गेलेले आहे.

**सारांश:**

नवदोत्तर आदिवासी मराठी आणि हिंदी कादंबऱ्यांतून आदिवासींच्या अनेक प्रश्नांना वाचा फोडलेली आहे. आदिवासींची आर्थिक लुट, निरक्षरतेमुळे फसवणुक, शोषण, दडपशाही, अन्याय, अत्याचार, शेठ, सावकार, वाणी, व्यापारी, ठेकेदार, जमीनदार, पोलीस प्रशासकिय अधिकारी, वनाधिकारी, महसुल खात्यातील अधिकारी अशी शोषकांची एक फळी उभी राहिलेली आहे. यास्वरूपाचे प्रश्न दोन्ही भाषांतील कादंबऱ्यांतून करण्यात आलेले आहेत. आदिवासींच्या आर्थिक शोषणाला, अत्याचाराला, व्यापारी, ठेकेदार, जमीनदार, विभिन्न अधिकाऱ्यांसह भांडवलदारांची फळी, लोकप्रतिनिधी, भोंदू बाबा हे देखील जबाबदार असल्याचे चित्रण आदिवासी हिंदी कादंबऱ्यांनी दाखवून दिलेले आहे. जे मराठी कादंबरीला दाखविता आलेले नाही. आदिवासींच्या दारीद्र्याला, गरीबीला, त्यांच्यातील भ्याडपणा, निरक्षरपणा आणि असंघटीतपणाला जबाबदार असल्याचे चित्रण मराठीतील 'टाहो', 'वाडा', या कादंबऱ्यांतून मांडण्यात आलेले आहे. तर हिंदीतील 'धार', 'काला पादरी', जहॉं बॉस फुलते है' ग्लोबल गॉव के देवता' या कादंबऱ्यांतून मांडण्यात आलेले आहे. म्हणजे हिंदी कादंबरी याबाबतीत मराठीपेक्षा उजवी ठरते.

भांडवलदार वर्गाच्या शिरकावाने आदिवासींच्या जल, जंगल व जमीनींची मोठी लुट होत आहे. आदिवासी भागातील कारखानदारीमुळे आदिवासींच्या आरोग्याचा बिकट प्रश्न निर्माण

झालेला आहे. खनीज संपत्तीचा मोठा उपसा करणारा वर्ग शासनाच्या नियमांचे उल्लंघन करत आहे. या प्रश्नांवर मराठी कादंबरीपेक्षा हिंदी कादंबरीने ठळकपणे चर्चा केलेली आहे. त्यामानाने मराठी कादंबरी यातील एकाही प्रश्नाला हात घालत नाही. आदिवासी भागात देशाच्या विकासाच्या नावाखाली महाकाय प्रकल्पांची निर्मिती केली जात आहे. आदिवासी इलाख्यातील जंगलांना 'अभयारण्य' घोषित करून त्यांच्या वस्त्या उजाडल्या जात आहे. यामुळे आदिवासींसमोर स्थलांतरणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. हे आदिवासींचे प्रश्न हिंदी कादंबरीने मोठया सामर्थ्यने मांडलेले आहे. नक्षलवादी, माओवादी संघटना आदिवासींच्या प्रश्नांसाठी लढत नसून ते आपला राजकिय स्वार्थ साधत आहे. मात्र आज आदिवासींवर नक्षलवादी आणि माओवादीचा शिक्का मारून त्यांची हत्या केली जात आहे. आदिवासी आपल्या मूळ हक्कांसाठी शासनाविरोधात लढा देत आहे. पण शासन, प्रशासन त्यांचे मूळ प्रश्न सोडविण्याऐवजी त्यांच्यावर अत्याचार करत असल्यामुळेच आदिवासी भयभीत आहे. या प्रश्नांची अधिक दखल हिंदी कादंबरीकारांनी घेतलेली आहे. आदिवासींच्या स्थलांतरणामुळे निसर्गधर्म नष्ट होत चालला आहे. कारण त्यांची प्रार्थनास्थळे विकासप्रक्रियेत नष्ट केली जात आहे. शिवाय आदिवासींच्या धर्मांतरणामागील मूळ प्रश्न शासनाने समजून घेतलेला नाही. आदिवासींना अलिकडे आपल्या धर्मातरातील शोषणामागील प्रयोजन प्रतित होत आहे. हा प्रश्न हिंदी कादंबरीने अधिक सामर्थ्याने विचारलेला आहे. **यासंदर्भात प्रमोद मुनघाटे** यांचे विवेचन पाहण्यासारखे आहे. ते लिहितात, "आदिवासींच्या अनेक प्रश्नांपैकी 'नक्षलवाद' हा एक सध्या महत्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नासह देशातील डाव्या चळवळी, पर्यावरणाचा प्रश्न, मानवी हक्कांचा प्रश्न, स्थलांतराचा प्रश्न या सर्व एकमेकांत गुंतलेल्या प्रश्नांचा आविष्कार करणाऱ्या कादंबऱ्या अलीकडे प्रसिद्ध झाल्या आहेत."[४] म्हणजेच आदिवासी जीवनावरील कादंबरी कमी असली तरी तिने अनेक सवाल उपस्थित केले आहेत असेच म्हणू शकतो.

**संदर्भ :**

१. डॉ. सगरे दशरथ, हिंन्दी के ऑंचलिक उपन्यासों में आदिवासी जनजीवन, दिव्य डिस्ट्रीब्यूटर्स, कानपुर, प्र. आ., पृ. ९४
२. डॉ. शिवाजी देवरे, डॉ. मधु खराटे (सं) समकालीन हिंदी उपन्यासों में आदिवासी विमर्श, विद्या प्रकाशन, कानपूर, पृ. १०८
३. डॉ. प्रमोद मुनघाटे, (सं) आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन, पृ. १३६
४. डॉ. प्रमोद मुनघाटे, (सं) आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन, पृ. १३६
५. डॉ. प्रमोद मुनघाटे, (सं) आदिवासी मराठी साहित्य : स्वरूप आणि समस्या, प्रतिमा प्रकाशन, पृ. १२

**साधन ग्रंथ :**

१. गावीत नजुबाई, 'तृष्णा', सत्यशोधक मार्क्सवादी प्रकाशन, धुळे, प्रथमावृत्ती, १९९५
२. मडावी बाबाराव, 'टाहो', प्रियंका प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती, १९९८
३. सरकुंडे माधव, 'वाडा', देवयानी प्रकाशन, यवतमाळ, प्रथमावृत्ती, १९९६
४. गावीत नजुबाई, 'भिवा फरारी', मावळाई प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २००८
५. चौधरी देवदत्त, 'पळसचोंड', मेधा पब्लिशिंग हाऊस, अमरावती, प्रथमावृत्ती, २०१६
६. संजीव, 'धार', राधाकृष्णन प्रकाशन, द्वितीयावृत्ती, २०११
७. तेजिन्दर, 'काला पादरी', साहित्य भंडार, इलाहाबाद, प्रथमावृत्ती, २०१६
८. मिश्र श्रीप्रकाश, 'जहॉं बॉंस फुलते हैं', यश पब्लिकेशन, दिल्ली, द्वितीयावृत्ती, २०११
९. पुष्पा मैत्रेयी, 'अल्मा कबूतरी', राजकमल प्रकाशन, नवी दिल्ली, सहावी आवृत्ती, २०१६
१०. रणेंद्र, 'ग्लोबल गॉंव के देवता', भारतीय ज्ञानपीठ, नवी दिल्ली, पाचवी आवृत्ती, २०१६